# उद्योग संचालनालय,

## भांडार खरेदी संघटना

**नविन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई ४०० ०३२.** दुरध्वनी क्रमांक-२२०२३५०५ वेबसाईट क्र.dicspo@maharashtra gov.in

क्र.उसं/मभांखसं/पुरवठादार/तक्रार/सर्व विभागाकडून बंदी/२०१७ /B- 2125 दिनांक- 23 NOV 2017

## सर्व विभागाकडून बंदी आदेश

वाचा:-१) अप्पर पोलिस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा,महाराष्ट्र राज्य, पुणे-१. यांचे पत्र क्र.कारखाना/नामका/निविदा/गैरव्यवहार/७४३८/कक्ष १० पुणे-१, दि.२५/७/२०१६ रोजीचे पत्र.

२) अप्पर पोलिस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा,महाराष्ट्र राज्य,पुणे-१.यांचेआदेश क्र.कारखाना/नारोमका/निविदा/७४३७/गैरव्यवहार/ कक्ष १० पुणे-१,दि.२५/७/२०१६.

३) मे.के.जी.एन.सेल्स,नाशिक यांना पत्र क्र.उसं/भांखस/तक्रार/११८/२०१६/बी-१०६३ दि.२४/०१/२०१७ अन्वये, खुलासा पत्र पाठविले होते.

४) जिल्हा उद्योग केंद्र, नाशिक, यांचा अहवाल पत्र क्र.जिउकेना/मभांखसं/ केजिएन सेल्स/२०१७/८४८,दि.२९/०३/२०१७.

५) उद्योग,उर्जा व कामगार विभागाने सर्व विभागांची बंदी घालणेबाबतचे आदेशास दिलेली मान्यता पत्र क्र.भांखस-२०१७/प.क्र.१४४/उद्योग-४,दि.२३ ऑगष्ट, २०१७.

प्रस्तावना

उपरोक्त संदर्भ (१) अन्वये,अप्पर पोलिस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा,महाराष्ट्र राज्य, पुणे-१. यांनी, अधिक्षक, नाशिक रोड मध्यवर्ती कारागृह यांनी राबविलेल्या निविदा प्रक्रियेमध्ये मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या मान्यताप्राप्त पुरवठादार यादीमध्ये समाविष्ट असणाऱ्या ' मे. के. जी. एन. सेल्स् नाशिक ' या संस्थेने बनावट कागदपत्राचे सहाय्याने सहभाग नोंदवून शासनाची फसवणूक केली असल्यामुळे त्यांचे नाव मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या मान्यताप्राप्त पुरवठादाराच्या यादीतून वगळण्यासाठी व सर्व विभागाकडून बंदी घालण्याची विनंती केली आहे.

अधिक्षक, नाशिकरोड मध्यवर्ती कारागृह यांनी सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाकरिता एम.एस.अँगल ४०X४०X५ एम.एम. खरेदी करण्याकरिता निविदा प्रक्रिया राबविली होती. सदर निविदा प्रक्रियेत मे. के.जी.एन. सेल्स, नाशिक या संस्थेने सहभाग नोंदविला होता. त्यावेळी मे. के.जी. एन. सेल्स, नाशिक या घटकाने बयाणा रक्कमेमधुन सुट मिळविणेकरिता मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना, जिल्हा उद्योग केंद्र, नाशिक यांचे पुरवठादार नोंदणी प्रमाणपत्र. एम.एस.अँगल ४०X४०X५ एम.एम.चा पुरवठा करण्यासाठी मे. मारुती इंडस्ट्रिज नाशिक यांचे प्राधिकार प्रमाणपत्र (अँथोरायझेशन) यांचा समावेश होता.

निविदा प्रक्रियेमध्ये मे. के.जी.एन.सेल्स, नाशिक यांचे प्रति किलो दर न्युनतम असल्याने त्यांना नियमानुसार निविदा स्विकृती पत्र (ए.एल.) व निविदा स्विकृती (ए.टी.) देण्यात आली. अधीक्षक, नाशिक रोड, मध्यवर्ती कारागृह यांनी दिलेल्या स्विकृती पत्र (ए.एल.) मधील कलम २ मध्ये मे.के.जी. एन.सेल्स. नाशिक यांनी मे.मारुती इंडस्ट्रिज नाशिक, यांनी उत्पादीत केलेले एम.एस.अँगल ४०X४०X५ एम.एम. चाच पुरवठा करावा असे नमुद केले आहे.

मे. के.जी.एन.सेल्स नाशिक, या घटकाला निविदा स्विकृती प्राप्त झाल्यानंतर त्यांनी दि.०७/०९/२०१५ रोजी एम.एस.अँगल ४०X४०X५ एम.एम. चा पुरवठा नाशिक रोड मध्यवर्ती कारागृह येथे केला. निविदा स्विकृती मधील शेडयूल ए च्या अट क्रमांक ४ नुसार पुरवठा केलेले उत्पादन हे मे. मारुती इंडस्ट्रिज नाशिक, यांनीच उत्पादीत केले असल्याबाबतचे मुळ उत्पादक/पुरवठादार यांचे पत्र सादर करणे आवश्यक असतानाही सदर पत्र हेतु पुरस्सरपणे सादर केले नाही. पुरवठा झालेल्या मालाबाबत तक्रार प्राप्त झाल्याने कारागृह विभागाने चौकशी केली त्याअनुषंगाने मे. के.जी.एन.सेल्स नाशिक, यांनी ज्या मे.मारुती इंडस्ट्रिज, नाशिक यांचे प्राधिकारपत्र सादर केले होते त्या मे. मारुती इंडस्ट्रिज, नाशिक यांचेकडून लेखी खुलासा प्रात करुन घेतला.

मे. मारुती इंडस्ट्रिज, नाशिक यांनी त्यांचे खुलासा पत्रामध्ये मे.मारुती इंडस्ट्रिज, नाशिक हे एम.एस.अँगल ४०X४०X५ एम.एम. चे उत्पादन करत नाहीत त्यामुळे उक्त पुरवठयाशी त्यांचा संबंध नाही. याचाच अर्थ मे.के.जी. एन. सेल्स नाशिक, यांनी पुरवठा केलेले एम.एस.अँगल ४०X४०X५ एम.एम.हे मे. मारुती इंडस्ट्रिज, नाशिक यांनी उत्पादीत केलेले नाही. तसेच मे. के. जी. एन. सेल्स नाशिक यांनी सादर केलेले प्राधिकार प्रमाणपत्र (ॲथोरायझेशन) हे बनावट असल्याचे सिध्द करण्याकरिता मे.मारुती इंडस्ट्रिज,नाशिक यांनी सादर केलेले लेटरहेड चे निरिक्षण केल्यानंतर मे. के. जी. एन. सेल्स, नाशिक यांनी नाशिक रोड मध्यवर्ती कारागृहास निविदा प्रक्रियेदरम्यान सादर केलेले प्राधिकार प्रमाणपत्र (ॲथोरायझेशन) हे खोटे व बनावट असल्याचे स्पष्ट होते. याबाबत मे. के.जी. एन. सेल्स नाशिक, यांनी अधिक्षक नाशिक रोड कारागृह यांचेकडे सादर केलेला खुलासा हा असंबंध्द,अविश्वसनीय व असमाधानकारक आहे.

यापुर्वीही कारागृह विभागाने सन २०११-१२ या वित्तीय वर्षाकरीता पाम फॅटी ॲसिडसाठी राबविलेल्या निविदा प्रक्रियेत मे. के.जी. एन. सेल्स, नाशिक यांनी खोटी कागदपत्रे सादर करुन सहभाग नोदविला होता. त्यावेळीही कारागृह मुख्यालयाने दिनांक ०४/०७/२०१२ च्या पत्रान्वये मे. के. जी. एन. सेल्स, नाशिक यांना खुलासा सादर करणेबाबत कळविले होते. त्या अनुषंगाने मे. के. जी. एन. सेल्स, नाशिक यांनी सादर केलेल्या खुलाशामध्ये झालेल्या चुकीबाबत क्षमायाचना करुन यापुढे अशी चुक होणार नाही अशी ग्वाही दिलेली होती. त्यानुसार, कारागृह विभागाचे पत्र क्रमांक ६५१६ दिनांक ०४/१०/२०१२ अन्वये मे. के.जी. एन. सेल्स, नाशिक यांना सक्त ताकीद देण्यात आली होती व यापुढे अशाप्रकारे निविदा प्रक्रियेत खोटी कागदपत्रे सादर केल्याचे आढळून आल्यास कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे सुचित करण्यात आले होते.

अशाप्रकारे सक्त ताकिद देऊनही मे. के. जी. एन. सेल्स, नाशिक यांनी पुन्हा खोटी कागदपत्रे सादर केली आणि अधीक्षक, नाशिकरोड मध्यवर्ती कारागृह यांना एम.एस.अँगल ४०X४०X५ एम.एम.पुरवठयासाठी कारस्थान रचले व जाणुनबुजून, हेतुपुर:स्सरपणे बनावट कागदपत्रे सादर करुन अधीक्षक, नाशिकरोड मध्यवर्ती कारागृह यांचेकडील निविदा प्रक्रियेत सहभाग नोंदवुन, शासनाची गंभीर फसवणुक केल्याचे निष्पन्न झाले आहे. मे. के.जी. एन. सेल्स, नाशिक यांची व्यापार शैली अत्यंत धोकादायक असल्याचे हे सिध्द झाले.

आहे. या गैरव्यवहारामुळे महाराष्ट्र कारागृहाचे मोठया प्रमाणात नुसकान झाले आहे. वेळेचा अपव्ययही झाला आहे. तसेच प्रशासना विरोधात तक्रार प्राप्त झाल्याने कारागृह विभागाची नामुष्की झालेली आहे. यामुळे कारागृह विभागाने उद्योग विभागाचे शासननिर्णय, दि.३०/१०/२०१५ मधील पान क्रमांक ६८,मुद्या क्रमांक ५.३ अ) नुसार कारवाई करीत १० वर्षाकरिता मे. के. जी. एन. सेल्स, नाशिक यांना कारागृह विभागास पुरवठा करण्याकरिता प्रतिबंधीत केले आहे.

मे. के. जी. एन. सेल्स, नाशिक यांचेकडून कारागृह विभागाचे तक्रारीबाबत संदर्भ (३) अन्वये खुलासा मागविण्यात आला होता. तथापी घटकाने अद्याप पर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

मे. के.जी.एन.सेल्स, नाशिक यांचेबाबत जिल्हा उद्योग केंद्र,नाशिक यांनी प्रथम भेट देऊन तपासणी केली असून कंपनी जानेवारी २०१६ पासुन बंद असलेबाबत कळविले आहे.

कारागृह विभागाने सादर केलेल्या चौकशी अहवालानुसार मे. के.जी. एन. सेल्स, नाशिक यांनी कारागृह विभागाची फसवणूक केली असून अशाच प्रकारे इतर शासकिय विभागांची फसवणुक/नुकसान होऊ नये यासाठी खरेदीची सुधारीत नियमपुस्तीका दि.०१/१२/२०१६ मधील परिच्छेद क्रमांक ५.२ आ) नुसार "सर्व विभागाकडून आणि त्यांच्या अधिपत्त्या खालील कार्यालयाकडून कायमस्वरुपी बंदी घालणे." ची कार्यवाही करण्यासाठी संचालनालयास शिफारस केली आहे.

**आदेश**

१) ज्याअर्थी, मे.के.जी.एन. सेल्स, नाशिक या निविदाकाराची उद्योग,उर्जा व कामगार विभाग,शासन निर्णय दि.०१/१२/२०१६ मधील परिच्छेद ५.२ (आ)अन्वये उद्योग संचालनालयाकडून सुणावणी घेऊन चौकशी करण्यात आली.

२) ज्याअर्थी, मे.के.जी.एन.सेल्स,नाशिक या निविदाकाराची खरेदी नियमपुस्तिका (पर्चेस म्यॅन्युअल) मधील खंड ५ च्या क्लॉज १२ (अे) (१)अन्वये केलेल्या चौकशीमध्ये कंपनीवर लावण्यात आलेले दोषारोप संपूर्णत:सिध्द होत आहेत व कंपनीस सिध्द अपराधी ठरविण्यात आलेले आहे. आणि

३) ज्याअर्थी, मे.के.जी.एन.सेल्स, नाशिक या कंपनीला दि.२४/०१/२०१७ रोजीच्या पत्रान्वये खुलासा मागविण्यात आला होता. तथापि त्यांचेकडून अद्यापपर्यंत कोणताही खुलासा सादर करण्यात आला नाही.

४) ज्याअर्थी, मे.के.जि.एन.सेल्स,नाशिक या कंपनीने सन २०११-१२ या वित्तीय वर्षाकरिता पाम फॅटी ॲसिडसाठी राबविलेल्या निविदा प्रक्रियेत अधिक्षक,मध्यवर्ती कारागृह नाशिक, या कार्यालयाने राबविलेल्या निविदा प्रक्रियेमध्ये बनावट कागदपत्राच्या आधारे सहभागी होऊन शासनाची फसवणूक केली असल्याने ते सकृतदर्शनी दोषी असल्याचे निदर्शनास आलेले आहे. आणि

५) ज्याअर्थी,उद्योग सह संचालक,उद्योग संचालनालय,मुंबई यांच्या दि.१३/०७/२०१७ च्या अहवालान्वये शाससन निर्णय दि.०१/१२/२०१६ मधील प्रकरण क्रमांक ०५ मधिल परिच्छेद क्र.५.३ मधील तरतुदीनुसार या घटकांस मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या मान्यताप्राप्त पुरवठाराच्या यादीतून काढून टाकण्याची शिफारस

केलेली आहे. तसेच या शासन निर्णयातील परिच्छेद क्र.५.२(आ)मधील तरतूदीनुसार सर्व विभागांकडून बंदी घालण्याबाबत शिफारस करण्यात आलेली आहे.

६) त्याअर्थी,मे.के.जि.एन.सेल्स, नाशिक या घटकांस, उद्योग,उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय दि.०१/१२/२०१६ मधील प्रकरण क्रमांक ०५ मधील परिच्छेद क्र.५.३ मधील तरतूदीनुसार मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या मान्यताप्राप्त पुरवठादाराच्या यादीतून काढून टाकण्यात येत आहे. तसेच याच शासन निर्णयातील परिच्छेद क्र.५.२(आ) मधील तरतूदीनुसार सर्व विभागांकडून या आदेशाच्या दिनांकापासून कायमस्वरुपी कालावधी करिता बंदी घालण्याचे आदेश देण्यात येत आहेत.

**विकास आयुक्त(उद्योग)**
**उद्योग संचालनालय,मुंबई.**

**प्रत**:-१) शासनाचे सर्व अप्पर मख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव(सर्व)--------------------------------------------
यांनी त्यांचे अधिपत्याखालील सर्व कार्यालये/मंडळ/महामंडळ यांना निदर्शनास आणण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करावी.

२) अप्पर पोलिस महासंचालक व कारागृह महानिरिक्षक कार्यालय महाराष्ट्र राज्य पुणे-४०० ००१.

३) मे.के.जि.एन.सेल्स,गाळा क्रमांक १२०,सिटी सेंटर,सिंधी कॉलनीसमोर, कलानगर, जेलरोड, नाशिक रोड,नाशिक.

४) निवडनस्ती (उद्योग-४).